# शिकवणीही ऑनलाइन

## शिक्षण संस्थांच्या मदतीला ॲप्स; लेक्चर्सचे व्हिडीओ व्हॉट्सॲपवर




कोल्हापूर टाइम्स टीम

लॉकडाउनच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षण सस्थांनी नवतंत्रज्ञानाचा अवलंब सुरू केला आहे. 'ऑनलाइन स्टडी फ्रॉम होम' हा नवा पाठ गिरविताना लेक्चर्सचे व्हिडिओ, फेसबुक व्हॉट्सॲपचा अवलंब केला आहे. लॉकडाउनच्या कालावधीत शिक्षणाचा ऑनलाइन मार्ग अनेकांसाठी उपयुक्त ठरला आहे.

अध्यापनाच्या नव्या वाटा चोखाळत सुट्टीच्या कालावधीत मुलांना अभ्यासात गुंतवून ठेवले आहे. करोनाचे संकट उद्‌भवल्यानंतर शाळा, कॉलेजांना सुट्टी जाहीर झाली. परीक्षा रद्द करण्यात आल्या. दरवर्षी सुट्टीच्या कालावधीत दहावी आणि बारावीसाठी जादा वर्गाचे आयोजन होते. यंदा मात्र शाळा, कॉलेजना सुट्ट्या असल्याने जादा वर्ग भरले नाहीत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या तयारीसाठी ऑनलाइन शिक्षण सुरू केले. शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्र, सायबर, केआयटी, विवेकानंद, कॉमर्स, न्यू, चाटे अशा विविध शिक्षण संस्थांनी अध्यापनाची नवी पद्धत अवलंबली.

एका विषयावर सलग सहा दिवस दिवस नोटस उपलब्ध करुन देतात. त्या नोटसवर रविवारी चाचणी परीक्षा होते. सराव प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर पाठविल्या जातात. विद्यार्थी त्याची सोडवणूक करून पुन्हा व्हॉट्सॲपवर पाठवितात. यू ट्यूबचा आधार घेतला जातो. लेक्चर्सचे व्हिडिओज ॲपवर अपलोड करुन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवितात. दहावी आणि बारावीचा अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. लॉकडाउनमुळे जादा वर्ग नाहीत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडू नये म्हणून विषयनिहाय तयारी सुरू केली आहे.



### घोडावत शिक्षण संकुलतर्फेही सुविधा

घोडावत शिक्षण संकुलामार्फत ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. घोडावत विद्यापीठ, इन्स्टिट्यूट, इंटरनॅशनल स्कूल, पॉलिटेक्निक, आयआयटी व मेडिकल ॲकेडमी, ज्युनिअर कॉलेज अशा सर्वच विभागांचा समावेश आहे. घोडावत सॉफ्टेकच्या संजय घोडावत लर्निंग ॲपद्वारे जेईई, नीट व सीईटी परीक्षांच्या तयारीसाठी सुमारे दोन लाख बहुपर्यायी प्रश्न तयार केले आहेत. लर्निंग ॲपद्वारे विद्यार्थ्यांची ऑनलाइन टेस्ट सीरीज घेतली.

### महापालिका शिक्षकही आघाडीवर

महापालिका शाळेतील अनेक शिक्षकांनी वर्गनिहाय विद्यार्थ्यांच्या पालकांचे व्हॉट्सॲप ग्रुप तयार केले आहेत. त्या ग्रुपवर विविध विषयांतील महत्वाचे मुद्दे, दहा गुणांच्या सराव प्रश्नपत्रिका पाठविल्या जातात. पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी सुरू केली आहे.

### खासगी क्लासचालकांकडूनही उजळणी

खासगी शिकवणी घेणाऱ्या क्लासचालकांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन लेक्चर्स उपलब्ध केले आहेत. या संदर्भात ऑक्सफर्ड क्लासेसचे अनिल महाजन म्हणाले, 'बारावी आणि सीए अभ्यासक्रमाचे व्हिडिओ लेक्चर्स तयार केले आहेत. ते गुगल क्लासरुम व यूट्यूबवर अपलोड केले जातात. गुगल क्लासरुमसंबंधी कोड विद्यार्थ्यांना दिले आहेत.

“

सरकारने, अकरावीच्या परीक्षा रद्द केल्याचे जाहीर केल्यापासून बारावीच्या वर्गांची तयारी सुरू आहे. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील बारावीच्या विद्यार्थ्यांचे व्हॉट्सॲप ग्रुप आहेत. गुगल, फेसबुकचा वापर होतो. व्हिडिओ लेक्चर्स ॲपद्वारे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

– प्रा. एम. आर. नवले,
विवेकानंद कॉलेज

# विद्यापीठांचे शैक्षणिक वर्ष सप्टेंबरमध्येच सुरू

## लॉकडाऊननंतर अभ्यासासाठी १५ दिवसाचा कालावधी : सर्वसाधारण जूनमध्ये परीक्षा होण्याची शक्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. लॉकडाऊननंतरच परीक्षा होणार असल्याने २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष सप्टेंबरमध्ये सुरू करण्याची शिफारस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने केली आहे. या शिफारशीवर सोमवारी (दि. २७) अंतिम निर्णय होईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयानुसार विद्यापीठांच्या परीक्षा कधी घ्यायच्या यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे. लॉकडाऊनमुळे परीक्षांसह नवीन शैक्षणिक वर्षासंदर्भात संदिग्धता आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया स्थगित केली आहे. म्हणूनच विद्यापीठ अनुदान आयोगाने नवीन



शैक्षणिक वर्ष, परीक्षा यासंदर्भातील उपाययोजनांसाठी समिती नेमली आहे. या समितीने अहवाल सादर केला आहे. लॉकडाऊननंतर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी १५ दिवसाचा कालावधी दिला जाईल. १ जून रोजी परीक्षेला प्रारंभ झाला तरी २५ जूनपर्यंत परीक्षा सुरू राहतील. परीक्षा संपल्यानंतर ४५ दिवसात म्हणजेच ऑगस्ट महिन्यात निकाल जाहीर होतील. याच कालावधीमध्ये प्रवेश परीक्षाही होतील. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंदाजानुसार सप्टेंबरमध्येच नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ होणार आहे.

### उच्च शिक्षण संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली निर्णय

लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. लॉकडाऊननंतर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी १५ दिवसाचा कालावधी दिला जाईल. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाच्या गाईडलाईननुसार पुढील शैक्षणिक वर्ष व परीक्षांचे नियोजन केले जाईल.

**डॉ. विलास नांदवडेकर**, कुलसचिव (शिवाजी विद्यापीठ)

### अधिविभागप्रमुखांची आज बैठक

विद्यापीठाच्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तसेच नॅक मुल्यांकनाचे कामही रखडले आहे. त्यामुळे विद्यापीठातील घडामोडींचा आढावा घेण्यासाठी आज (दि. २७) सकाळी ११ वाजता विद्यापीठातील सर्वसाधारण ४० अधिविभागप्रमुख, संचालक आणि समन्वयकांची ऑनलाईन बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये मार्च-एप्रिलच्या परीक्षेसंदर्भात अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे का? विद्यार्थ्यांना लॉकडाऊनच्या कालावधीत काही असायमेंट दिल्या आहेत का? सध्या संशोधनाची स्थिती काय आहे. विद्यापीठ नॅक मूल्यांकनाची तयारी कुठपर्यंत झाली आहे. यावर चर्चा होणार आहे.

तरुण भारत Mon, 27 April 2020
https://epaper.tarunbharat.com/c/51350833

लोकमत

# विद्यापीठात ८० बेडचे रुग्णालय तयार

## सेमी आयसीयू'चा समावेश : रुग्णाच्या तपासणीसह प्रवेशित करण्याची व्यवस्था

**संतोष मिठारी** ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील मुलींच्या वसतिगृहात ८० बेडचे रुग्णालय (कोविड केअर सेंटर) तयार झाले आहे. त्याठिकाणी पाच बेडचा सेमी आयसीयू (अतिदक्षता विभाग) कक्ष असणार आहे. अतिरिक्त वैद्यकीय सुविधा म्हणून जिल्हा प्रशासनाच्यावतीने संबंधित व्यवस्था करण्यात आली आहे. या रुग्णालयात तपासणीसह ॲडमिट करण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

कोरोनाबाबतची दक्षता म्हणून जिल्हा प्रशासनाने तंत्रज्ञान विभागाच्या मुले आणि मुलींची वसतिगृहे ताब्यात घेतली. त्यातील मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीत ४४ जणांचे अलगीकरण केले आहे. उर्वरित खोल्यांमध्ये ८० बेडचे रुग्णालय तयार केले आहे. टप्प्याटप्प्याने या रुग्णालयाची क्षमता ३५० बेडपर्यंत वाढविण्यात येणार आहे. या वसतिगृहातील रिडींग हॉलमध्ये करण्यात येणाऱ्या पाच बेडच्या सेमी आयसीयू कक्षाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या कक्षात दोन व्हेंटिलेटरची सुविधा असणार आहे.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून जिल्हा प्रशासनाच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये ८० बेडचे रुग्णालय तयार झाले आहे.

### कर्मचाऱ्यांची प्रतीक्षा

पहिल्या टप्प्यातील ८० बेडचे रुग्णालय वापरासाठी सज्ज झाले आहे. याठिकाणी डॉक्टर, परिचारिका, आदी कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर याचा कोणत्याही क्षणी वापर सुरु करता येणार आहे. रुग्णांचा भार वाढल्यास मदत होणार आहे.

“या वसतिगृहातील रुग्णालय हे कोविड केअर सेंटरप्रमाणे काम करणार आहे. सध्या ८० बेडचे रुग्णालय तयार झाले आहे. सेमी आयसीयू लवकरच तयार होईल.

- **संभाजी माने**, समन्वयक, कोविड केअर सेंटर, तंत्रज्ञान अधिविभाग

# राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे सॅनिटायझर, मास्क वाटप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे विद्यापीठात अत्यावश्यक सेवेवर कार्यरत असणाऱ्या सेवकांबरोबरच विद्यापीठ कॅम्पसवरील रहिवाशांना सॅनिटायझर आणि मास्कच्या एक हजार किटचे वाटप करण्यात आले. विद्यापीठात सुरक्षा, उद्यान, आरोग्य तसेच पाणीपुरवठा आदी सेवांवर कर्मचारी कार्यरत आहेत. विविध निवासस्थानांत अनेक शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि त्यांचे कुटुंबीय राहतात. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निवासस्थानापासून वाटप करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन मेमध्ये होणार का?

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन मेमध्ये होणार का? याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संचारबंदीची मुदत वाढविण्यात येणार असल्याच्या चर्चेमुळे ते कधी होईल, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. विद्यापीठ प्रशासनाने फेब्रुवारीत नॅकला विद्यापीठाचा डाटा पाठविला आहे. संचारबंदीमुळे नॅक समिती व विद्यापीठ प्रशासनात संवाद झालेला नाही. ३ मे नंतरसुद्धा संचारबंदी वाढविण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. याबाबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी संचारबंदी उठल्यानंतरच नॅकच्या मूल्यांकनाची तारीख कळू शकेल, असे सांगितले.